C 272
CC

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
ठाणे शाखा

जा.क्र. बिशेप/बांध/निवासी/मौजे म्हारळ खुर्द/ता.कल्याण/ससंठाणे/ २८०० 955

सहायक संचालक, नगर रचना,
ठाणे, जिल्हाधिकारी, इमारत,
३ रा मजला, कोर्ट नाका,
ठाणे (प).
दुरध्वनी क्र:- ०२२/२५३४२७४४
ई-मेल-adtp_thane@rediffmial.com
दि. ०४/१०/२०१३

प्रति,
मा. जिल्हाधिकारी,
ठाणे.

विषय :- मौजे म्हारळ खुर्द, ता. कल्याण येथील स.क्र. ८/१,८/२,१२/१ ते १२/७, १३/१, १३/२,१४/१ ते १४/४ एकुण क्षेत्र ५१०७० चौ.मी.या जागेवर रहिवास व वाणिज्य प्रयोजनाकरीता बिनशेती व बांधकाम नकाशांना मंजूरी मिळणेबाबत.

संदर्भ :- १) मा.जिल्हाधिकारी,ठाणे यांचेकडील परिपत्रक क्र.महसुल/कक्ष-१/टे/११/परिपत्रक/०३/१३, दि.२६/०३/२०१३ व सुधारित अ.कृ.परिपत्रक ०५/१३, दि.२९/५/२०१३
२) अर्जदार यांचे दिनांक ११/८/२०१३ रोजीचे पत्र.

Mharal.

महोदय,

वरिल विषयात नमूद केलेली अर्जदार यांची जागा मंजूर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीत समाविष्ट असून अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर व परिसर अधिसूचित क्षेत्राच्या मंजूर विकास योजनेमध्ये मौजे म्हारळ खुर्द, येथील स.क्र. ८/१,८/२,१२/१ ते १२/७, १३/१,१३/२,१४/१ ते १४/४ एकुण क्षेत्र ५१०७० चौ.मी.हा रहिवास या वापर विभागात अंतर्भूत होत आहे. याबाबत कार्यालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुत जागेपैकी ४३५०० चौ.मी. क्षेत्राचे अकृषिक परवानगी मिळणेबाबतचे प्रकरण अभिप्रायासाठी यापूर्वी आपल्या कार्यालयाकडून पत्र क्र.महसूल/क-१/टे-७/म्हारळ-कल्याण/एसआर-१३९/२०११,दि.१७/८/२०११ च्या पत्रान्वये या कार्यालयाकडे प्राप्त झालेले होते. तथापि सदर प्रकरणातील जमिन सॅक (Space Application Centre) अहमदाबाद यांनी तयार केलेल्या १:२५००० या प्रमाणातील मंजूर सिआरझेड वर्गीकरणाच्या नकाशानूसार उच्च भरती रेषेपासून ५०० मी. अंतराच्या आंत समाविष्ट आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात या कार्यालयाने पत्र क्र.२९२,दि.३१/०१/२०१२ अन्वये विहीत मार्गाने मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे प्रस्तुत जागेत बिनशेती परवानगीकामी केंद्रशासनाच्या दि.०६/०१/२०११ च्या पर्यावरण व वन विभागाकडील सिआझेड संदर्भातील अधिसूचनेनूसार परवानगी दयावी किंवा कसे याबाबत मार्गदर्शन व आदेश होणेबाबत विनंती केलेली होती. तथापि सदर प्रकरणाबाबत शासनाच्या नगर विकास विभागाकडून कोणतेही मार्गदर्शन/आदेश प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे अर्जदार यांचे प्रकरण या कार्यालयाकडे दि.१७/८/२०११ पासून प्रलंबित होते. तदनंतर प्रस्तुत प्रकरणातील जमिन मालक व अर्जदार श्री.मुरलीधर रामचंद्र पनवेलकर यांनी जानेवारी-२०१३ मध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे रिट पिटीशन क्र.१६९४/२०१३ दाखल केलेला आहे. सदर रिट पिटीशन मध्ये अर्जदार यांनी प्रतिवादी क्र.१ मा.प्रधान सचिव,पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन व प्रतिवादी क्र.२ मा.सचिव, पर्यावरण विभाग (MCZMA) प्रतिवादी क्र.३ मा.जिल्हाधिकारी,ठाणे, प्रतिवादी क्र.४ मा.उपसंचालक, नगर रचना, कोकण विभाग,नवी मुंबई व सहायक संचालक, नगर रचना,ठाणे (या कार्यालयास प्रतिवादी केलेले असून प्रतिवादी क्र.६ व ७ हे अनुक्रमे केंद्रशासन व NCZMA हे आहेत. सदर रिट पिटीशनबाबत मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी दि.१२/८/२०१३ रोजी निर्णय दिलेला असून सदर प्रकरणातील अर्जदार श्री.पनवेलकर यांनी सदर निकालाची स्वाक्षांकित प्रत या कार्यालयाकडे सादर केलेली आहे. सोबत सदर निकालाची छायाप्रत जोडली आहे.

मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी प्रस्तुत रिट पिटीशन प्रकरणात दिलेल्या निर्णयाचे अवलोकन केले असता सदर न्यायालयीन आदेशातील पृष्ठ क्रं.६ वर प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार यांची जागा Institute of Remote Sensing (IRS) Chennai यांनी तयार केलेल्या १:४००० या प्रमाणातील नकाशानूसार उल्हास नदीपासून २४०.६ मी. अंतरावर आहे व सिआरझेड हद्दीपासून १.५ किमी अंतरावर आहे. सदर बाब विचारात घेता विचारात घेता अर्जदार यांची जागा सिआरझेडमुळे बाधित होत नसल्याचे स्पष्ट होते. केंद्र शासनाच्या दि.०६/०१/२०११ च्या अधिसूचनेनूसार अर्जदार यांच्या जागेत वरील परिस्थिती विचारात घेता विकसन परवानगी अनुज्ञेय होते. अशा आशयाचा तपशिल नमूद केलेला आहे.